# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उप प्रादेशिक कार्यालय, अकोला

## पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीची सूचना

जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय ता. जि. अकोला यांनी त्यांच्या प्रस्तावित १५ रेतीघाटांच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्याबाबत मंडळाकडे अर्ज सादर केला आहे. सदरील प्रस्तावित प्रकल्पाकरिता भारत सरकारच्या पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्लीचे १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिनियमान्वये व ०१ डिसेंबर, २००९ च्या सुधारित अधिनियमान्वये उपरोक्त प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यात येत आहे.

प्रकल्प प्रवर्तकाच्या विनंतीस अनुसरून सदर जनसुनावणी पर्यावरणविषयक बाबींबाबत घेण्यात येत असुन सदर नियोजित प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवासी, पर्यावरणविषयक काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवासी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावीत होणारे रहिवासी यांना सदर प्रकल्पासंबंधी टीका-टिप्पणी, अभिप्राय किंवा आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरूपात नोंदविता येईल.

सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक, सुचना, विचार, टीका-टिप्पणी, अभिप्राय तसेच आक्षेप ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत खालील पत्त्यावर नोंदविण्यात याव्यात किंवा या कार्यालयाच्या ई-मेलवर पाठविण्यात यावेत.

**उप-प्रादेशिक कार्यालय,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,**
**आळशी प्लॉट, हुतात्मा स्मारकाच्या समोर,**
**नेहरू पार्क चौक, अकोला - ४४४००१**
**फोन नं. ०७२४-२४०२३४४**
**email - sroakola@mpcb.gov.in**
**dmoakola2@gmail.com**

मौखिक किंवा लेखी आक्षेप जाहिर जनसुनावणीच्या वेळेस सुध्दा नोंदविता येईल. जाहिर जनसुनावणी खालील ठिकाणी घेण्यात येईल.

**दिनांक - ०३/१०/२०२४**
**वेळ - दुपारी ३.०० वाजता**
**स्थळ - नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला.**

सदर प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक माहिती असलेले दस्तावेज खालील कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये सदर दस्तावेज अभ्यासु शकतील.

1. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०००२२
2. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी बापटवाडी, विवेकानंद कॉलनी जवळ, अमरावती - ४४४६०६
3. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, आळशी प्लॉट, हुतात्मा स्मारकाच्या समोर, नेहरू पार्क चौक, अकोला - ४४४००१
4. जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला, जिल्हा परिषद, अकोला, जिल्हा उद्योग केंद्र, अकोला.
5. जिल्ह्यातील सर्व उप-विभागीय कार्यालये, सर्व तहसिल कार्यालये व ग्रामपंचायत कार्यालय, कपिलेश्वर ता. अकोला, वडोद खुर्द ता. अकोला, एकलारा ता. अकोला, कटयार ता. अकोला, म्हैसांग ता. अकोला, उगवा ता. अकोला, केळीवेळी, ता. अकोट, पिलकवाडी ता. अकोट, निंबी ता. बाळापूर, बहादूरा ता. बाळापूर सागद ता, बाळापूर, नागद ता, बाळापूर, लोहारा ता. बाळापूर डोंगरगाव ता. बाळापूर, मांजरी ता. बाळापूर जि. अकोला

सदर जनसुनावणी दिनांक ०३/१०/२०२४ रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे रेतीघाटनिहाय घेण्यात येईल.

**स्वा/-**
**उप-प्रादेशिक अधिकारी**
**म.प्र. नि. मंडळ, अकोला**
**तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी.**